# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २९.०८.२०२६

## नागपूर ग्रामीणमध्ये डि.जे. व लेझर लाईट  मुक्त गणेश विसर्जन; शांतता, शिस्त आणि उत्साहात ५५६ गणेशमूर्तींचे विसर्जन

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्ह्यात यावर्षी एकूण ५५६ सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन डि.जे. व लेझर लाईट मुक्त वातावरणात शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलाच्या वतीने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासोबतच ध्वनिप्रदूषणास आळा घालण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. नागरिक, गणेश मंडळे तसेच डिजे चालकांना ध्वनिप्रदूषणाबाबत आवश्यक सूचना देऊन पर्यावरणपूरक व शांततामय पद्धतीने गणेश विसर्जन करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मा .श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली संपुर्ण गणेशोत्सव तसेच गणेश विसर्जन काळात ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी व रुग्णांच्या आरोग्यावर मोठ्या आवाजाचा विपरीत परिणाम होऊ नये, सार्वजनिक शांतता भंग होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडू नये, यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यात ध्वनीप्रदूषणाबाबत आवश्यक आदेश निर्गमित करण्यात आले होते तसेच कलम ३६(ई) (ई—ए) व कलम ३८(१) महराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये अधिसुचना जारी करण्यात आली होती. सदर आदेशानुसार, परवानगी मिळाल्यानंतरही संबंधित आयोजकांना **Noise Pollution (Regulation and Control) Rules** २००० मध्ये निर्धारित करण्यात आलेल्या ध्वनी मर्यादेचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक करण्यात आले होते. तसेच  ध्वनिप्रदूषण नियंत्रणाच्या अनुषंगाने

संबंधितांना लेखी आदेश व सूचना देण्यात आल्या होत्या. विसर्जन मिरवणुकीदरम्यान डिजे चा वापर न करण्याबाबत गणेश मंडळांना तसेच डिजे चालकांना स्पष्टपणे सूचना देण्यात आल्या होत्या.

नागपुर ग्रामीण जिल्हयात गणेशोत्सवाच्या कालावधीत गणेश मंडळांचे पदाधिकारी, आयोजक तसेच डिजे चालक यांच्याशी समन्वय साधण्यासाठी पोलीस विभागाच्या वतीने गणेश मंडळांचे पदाधिकारी, आयोजक यांच्या उपविभाग स्तरावर ६ बैठका घेतल्या तसेच पोलीस स्टेशन स्तारावर २४ बैठका आणि डिजे चालक यांच्या पोलीस स्टेशन स्तरावर २४ बैठका अशा एकूण ५४ बैठका घेण्यात आल्या. या बैठकींमध्ये ध्वनिप्रदूषणासंदर्भातील नियम, न्यायालयीन निर्देश तसेच विसर्जन मिरवणुकीदरम्यान शांतता व सुव्यवस्था राखण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले होते.

पोलीस विभागाने केलेल्या पूर्वनियोजनाचा तसेच गणेश मंडळे, आयोजक आणि नागरिकांनी दिलेल्या सहकार्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. नागपूर ग्रामीण जिल्ह्यात गणेश विसर्जनाच्या वेळी कोठेही डिजे चा वापर करण्यात आला नाही. तसेच लेझर लाईटचा सुध्दा वापरही करण्यात आला नाही. त्यामुळे गणेश विसर्जन मिरवणुका शांततामय वातावरणात पार पडल्या.

गणेशोत्सवाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून संवेदनशील ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी विसर्जन मार्ग, गर्दीची ठिकाणे तसेच विसर्जन स्थळांवर प्रत्यक्ष उपस्थित राहून परिस्थितीवर लक्ष ठेवले. नागरिकांनी तसेच गणेश मंडळांनी पोलीस प्रशासनाच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत डिजे आणि लेझर लाईट मुक्त, शांततामय आणि शिस्तबद्ध गणेश विसर्जनात सहकार्य केले.

TheHitavada
Nagpur City Line | 2026-09-30 | Page- 2
ehitavada.com

# Nagpur Rural Police' early meetings with mandals keep Ganesh Visarjan DJ-free

■ **Staff Reporter**



EARLY planning and regular meetings with Ganesh mandals helped Nagpur Rural Police conduct the immersion of 556 public Ganesh idols peacefully this year. There were no DJs or laser lights during the immersion processions across the district.

The police started preparations well before the festival. Officials held meetings with mandal office-bearers, organisers and DJ operators.

They explained the noise pollution rules, court directions and restrictions on DJs and laser lights. A total of 54 meetings were held across Nagpur Rural. Six meetings were conducted at the sub-divisional level. Another 24 meetings each were held at police station level with mandal organisers and DJ operators.

The meetings helped the police communicate the rules clearly to the organisers. They also helped avoid confusion during the immersion processions. Superintendent of Police Dr Harssh A Poddar and Additional SP Anil Mhaske had directed officers to focus on advance planning and coordination with the mandals. Written instructions were also issued regarding noise pollution.

Organisers were told to follow the prescribed noise limits even after obtaining permission for the celebrations, said a police official.

The police also remained present along immersion routes, at crowded places and at sensitive locations. This helped maintain law and order during the processions.

The cooperation of Ganesh mandals and citizens also played an important role. Organisers responded positively to the police appeal and avoided the use of DJs and laser lights, the official added. As a result, all 556 public Ganesh idols were immersed in a peaceful and disciplined atmosphere.

## Cooperation helps prevent problems: SP Dr Poddar



SP Dr Poddar said the experience showed that early planning, direct communication and cooperation with organisers can help prevent problems during large public celebrations.

Powered by Bharati Web





# रंग लाई हर्ष पोद्दार की पहल, डीजे के धड़ाकों के बगैर ग्रामीण नागपुर में 556 गणेश प्रतिमाओं का विसर्जन

नागपुर। नागपुर ग्रामीण के वरिष्ठ पुलिस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार की पहल रंग लाई। गणेशोत्सव के दौरान ध्वनि प्रदूषण पर नियंत्रण और शांतिपूर्ण विसर्जन के लिए नागपुर ग्रामीण पुलिस द्वारा चलाया गया अभियान सफल रहा। जिले मे इस वर्ष 556 सार्वजनिक गणेश प्रतिमाओं का विसर्जन डीजे और लेजर लाइट के बगैर शांतिपूर्ण एवं अनुशासित वातावरण मे संपन्न हुआ।

वरिष्ठ पुलिस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार तथा अपर पुलिस अधीक्षक अनिल म्हस्के के मार्गदर्शन मे नागपुर ग्रामीण पुलिस ने गणेशोत्सव से पहले ही ध्वनि प्रदूषण को नियंत्रित करने के लिए व्यापक नियोजन किया था। पुलिस ने नागरिको, गणेश मंडलो, आयोजको और डीजे संचालको से संवाद कर गणेश विसर्जन पर्यावरणपूरक एवं शांतिपूर्ण तरीके से करने का आह्वान किया। इसके लिए नागरिको के विभिन्न समूहो के साथ गणेशोत्सव के दौरान ध्वनि प्रदूषण रोकने के लिए पुलिस प्रशासन ने गणेश मंडलो के पदाधिकारियो, आयोजको और डीजे संचालको के साथ कुल 54 बैठकें की। इनमे उपविभाग स्तर पर गणेश मंडलो के पदाधिकारियो एवं आयोजको के साथ 6 बैठकें, पुलिस थाना स्तर पर गणेश मंडलो के पदाधिकारियो एवं आयोजको के साथ 24 बैठकें तथा डीजे संचालको के साथ 24 बैठकें शामिल थीं। इन बैठको मे ध्वनि प्रदूषण से संबंधित नियमो, न्यायालयीन निर्देशो तथा गणेश विसर्जन जुलूस के दौरान शांति एवं कानून-व्यवस्था बनाए रखने के संबंध मे विस्तार से मार्गदर्शन दिया गया। डीजे संचालको और गणेश मंडलो को विसर्जन जुलूस के दौरान डीजे का उपयोग नही करने के स्पष्ट निर्देश दिए गए।

## बुजुर्गों, बच्चों और मरीजों के स्वास्थ्य पर विशेष ध्यान

वरिष्ठ पुलिस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार के मार्गदर्शन मे गणेशोत्सव एवं विसर्जन के दौरान तेज आवाज से होने वाले ध्वनि प्रदूषण को नियंत्रित करने के लिए आवश्यक आदेश जारी किए गए थे। इसका उद्देश्य विशेष रूप से वरिष्ठ नागरिको, छोटे बच्चो, विद्यार्थियो और मरीजो के स्वास्थ्य पर तेज आवाज के प्रतिकूल प्रभाव को रोकना तथा सार्वजनिक शांति एवं कानून-व्यवस्था बनाए रखना था। महाराष्ट्र पुलिस अधिनियम की धारा 36(ई)(ई-ए) और धारा 38(1) के तहत अधिसूचना जारी की गई थी। अनुमति प्राप्त होने के बावजूद आयोजको के लिए निर्धारित ध्वनि सीमा का कड़ाई से पालन करना अनिवार्य किया गया था। संबंधितो को ध्वनि प्रदूषण नियंत्रण के संबंध मे लिखित आदेश एवं आवश्यक निर्देश भी दिए गए। इसलिए विसर्जन के दौरान न डीजे बजा, न लेजर लाइट चली एवं पुलिस प्रशासन के पूर्व नियोजन और गणेश मंडलो, आयोजको तथा नागरिकों के सहयोग का सकारात्मक परिणाम विसर्जन के दौरान दिखाई दिया। नागपुर ग्रामीण जिले मे गणेश विसर्जन के दौरान कही भी डीजे का इस्तेमाल नहीं हुआ। लेजर लाइट का उपयोग भी नही किया गया। कानून-व्यवस्था बनाए रखने के लिए नागपुर ग्रामीण पुलिस ने संवेदनशील स्थानो पर पर्याप्त पुलिस बंदोबस्त तैनात किया था। पुलिस अधिकारी और जवान विसर्जन मार्गों, भीड़ वाले स्थानो तथा विसर्जन स्थलो पर प्रत्यक्ष रूप से मौजूद रहे और पूरे समय स्थिति पर नजर बनाए रखी। नागपुर ग्रामीण पुलिस द्वारा किए गए पूर्व नियोजन के साथ ही गणेश मंडलों, आयोजकों और नागरिकों के सहयोग ने इस अभियान को सफल बनाया। नागरिकों ने पुलिस प्रशासन के आह्वान को सकारात्मक प्रतिसाद देते हुए डीजे और लेजर लाइट से मुक्त, शांतिपूर्ण एवं अनुशासित तरीके से गणेश विसर्जन किया।





तरुण भारत
आपले नागपूर | 2026-10-01 | Page- 2
epaper.tarunbharat.net

# नागपूर ग्रामीणमध्ये 'डीजे, लेझर लाईटमुक्त' गणेश विसर्जन



## ध्वनिप्रदूषणाला फाटा देत पर्यावरणपूरक सोहळा

**नागपूर, ३० सप्टेंबर**

जिल्ह्यातील ग्रामीण भागात यावर्षी गणेश विसर्जन मिरवणुका पूर्णपणे डिजे आणि लेझर लाईटमुक्त वातावरणात शांतता व शिस्तीत पार पडल्या. वरिष्ठ पोलिस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्केयांच्या मार्गदर्शनाखाली एकुण ५५६ सार्वजनिक गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले.

ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी व रुग्णांचे आरोग्य जपण्यासाठी महाराष्ट्र पोलिस अधिनियम व नियमांचे काटेकोर पालन करत प्रशासनाने विशेष पावले उचलली होती. विसर्जनापूर्वी उपविभाग व पोलिस ठाणे स्तरावर गणेश मंडळे आणि डिजे चालकांच्या एकूण ५४ बैठका घेत जनजागृती करण्यात आली. या पूर्वनियोजनाला व पोलिस प्रशासनाच्या आवाहनाला नागरिक व गणेश मंडळांनी उत्स्फूर्त सहकार्य केले. परिणामी, कुठेही डिजे किंवा लेझर लाईटचा वापर झाला नाही, ज्यामुळे नागपूर ग्रामीणमध्ये आदर्श आणि शांततामय गणेश विसर्जनाचा नवा पायंडा पडला आहे.

◀ (तभा वृत्तसेवा)

## गणरायाला भक्तिमय वातावरणात निरोप

कन्हान : पोलिस स्टेशन येथे विराजमान झालेल्या लाडक्या गणरायाला सोमवारी ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलालाची उधळण करत भक्तिमय वातावरणात भावपूर्ण निरोप देण्यात आला. गणेश चतुर्थीला सहायक पोलिस अधिकारी शशांक गौडा व पोलिस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांच्या उपस्थितीत बाप्पाची स्थापना झाली होती. उत्सवादरम्यान दररोज नियमित आरती व पूजा करण्यात आली. विसर्जनाच्या दिवशी प्रसादाचे वाटप झाल्यानंतर पोलिस स्टेशन परिसरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. महामार्गावरून मार्गक्रमण करत ही मिरवणूक काली घाटावर पोहोचली. तिथे विधिवत पूजा-अर्चना करून कन्हान नदीपात्रात गणरायाचे विसर्जन करण्यात आले. ■

सकाळ

# नागपूर ग्रामीणमध्ये डीजे-लेझरमुक्त गणेश विसर्जन

## पर्यावरणपूरक विसर्जनाच्या आवाहनाचा प्रतिसाद : ध्वनिप्रदूषणाला आळा

■ **सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. २९ : जिल्ह्यात यंदा ५५६ सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन डीजे व लेझर लाईटमुक्त वातावरणात शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पोलिस विभागाने विशेष नियोजन केले होते. नागरिक, गणेश मंडळे व डीजे चालकांना ध्वनिप्रदूषणाबाबत सूचना देऊन पर्यावरणपूरक विसर्जनाचे आवाहन करण्यात आले होते.

गणेश मंडळांचे पदाधिकारी व आयोजकांसोबत उपविभाग स्तरावर सहा, पोलिस ठाणे स्तरावर २४, तर डीजे चालकांसोबत २४ बैठका घेण्यात आल्या. या बैठकीत ध्वनिप्रदूषणाचे नियम, न्यायालयीन निर्देश आणि विसर्जन मिरवणुकीतील शांतता व सुव्यवस्थेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलिसांनी संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त तैनात करून विसर्जन मार्ग, गर्दीची ठिकाणे आणि विसर्जनस्थळांवर लक्ष ठेवले. वरिष्ठ पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिक व गणेश मंडळांनी पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद दिल्याने विसर्जन शांततेत पार पडले.





**नागपूर :** ढोल ताशांच्या गजरात विसर्जनाचा आनंद घेताना गणेश भक्त. दुसऱ्या छायाचित्रात टाळ, मृदंग वाजवताना गणेश मंडळाचे सदस्य

> पोलिस विभागाच्या पूर्वनियोजनासोबतच गणेश मंडळे, आयोजक आणि नागरिकांनी दिलेल्या सहकार्यामुळे यंदाचे विसर्जन शांतता व शिस्तीत पार पडले. डीजे आणि लेझर लाईटचा वापर न झाल्याने सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्यास मदत झाली.
>
> - **हर्ष पोद्दार,** वरिष्ठ पोलिस अधीक्षक, नागपूर ग्रामीण.